नि.फौ.ख.क्र. २३९/२०२५
सरकार-वि- पंढरी व इतर
निशाणी क्र. ४०

**<u>साक्षीदार क्र. २ गौतम गंगाधर शेंडे यांचा सरतपास सरकारतर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती. एच.एन. डेकाटे यांच्यामार्फत शपथेवर सुरू.</u>**

**२.** दि.१७.०३.२०२५ रोजी आरोपी किशोर दौलत भलावी याला अटक केली व अटक आणि झडती पंचनामा माझ्यासमक्ष झाला. तो मला दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ४२** देण्यात येते. माझ्यासमक्ष काळया पांढ-या रंगाचे पोशाख मळलेले कपडे जप्त केले. दि. १७.०३.२०२५ रोजी आरोपी नंदू किशोर भलावी याला अटक केली त्याप्रमाणे अटक पंचनामा माझ्यासमक्ष केला. तो मला दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ४३** देण्यात येते. दि. १४.०३.२०२५ रोजी नंदू भलावी यांच्याकडून मोबाईल जप्त करण्यात आला. त्याप्रमाणे जप्ती पंचनामा केला. तो मला दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ४४** देण्यात येते. दि.१७.०३.२०२५ रोजी आरोपी छेदिराम ठाकूर याला अटक केली. त्याप्रमाणे अटक पंचनामा केला. तो मला दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ४५** देण्यात येते. दि. १७.०३.२०२५ रोजी छेदिराम ठाकूरचा अंगझडती पंचनामा करण्यात आला. तो मला दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ४६** देण्यात येते. दि. १९.०३.२०२५ रोजी सोनपूर येथे लागून असलेल्या शेतामध्ये पोलिसांनी मला बोलावले होते. तेथे माझ्यासमक्ष घटनास्थळ पंचनामा केला. तो मला दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. तो **निशाणी क्र. २४** वर आहे.

**सरकारी वकीलांच्या तोंडी विनंतीवरून सरतपास दुस-या सत्राकरिता तहकूब.**

श्रवणोत्तर स्वीकृत
समक्ष

SONPARI MAHENDRA GADE
Digitally signed by SONPARI MAHENDRA GADE
Date: 2026.01.19 12:55:59 +0530

(एस. एम. गाडे)
**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
(न्यायालय क्र.०३) सावनेर

सावनेर,
दिनांक १४.०१.२०२६

**<u>साक्षीदार क्र. २ गौतम गंगाधर शेंडे यांचा सरतपास सरकारतर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती. एच.एन. डेकाटे यांच्यामार्फत शपथेवर सुरू.</u>**

**३.** दि. १४.०३.२०२५ रोजी जर्मनचे घमेले, प्लास्टीक कोटेड तार, एक बांबूचा आकोडा जप्त करण्यात आला. त्याप्रमाणे जप्ती पंचनामा केला. मला जप्ती पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ४७** देण्यात येते. दि. १९.०३.२०२५ रोजी दरसमा व मानिक शिलू यांची अंगझडती घेण्यात आली. त्यामध्ये त्यांचे कपडे जप्त करण्यात आले. अंगझडती पंचनामा मला दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ४८** देण्यात येते. दि. १९.०३.२०२५ रोजी मानिक शिलू व दरसमा यांना अटक करण्यात आली. त्याप्रमाणे अटक पंचनामा केला. तो मला दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ४९** देण्यात येते. दि. २१.०३.२०२५ रोजी टेकाडी गावात मोका पंचनामा करण्यात आला. तो मला दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ५०** देण्यात येते. दि. २२.०३.२०२५ रोजी किशोर भलावी यांची मोटर सायकल जप्त करण्यात आली होती. त्याप्रमाणे जप्ती पंचनामा तयार करण्यात आला. तो मला दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ५१** देण्यात येते. दि. २२.०३.२०२५ रोजी नंदू भलावी यांच्या कडून दोन सु-या जप्त करण्यात आल्या होत्या. त्याप्रमाणे जप्ती पंचनामा तयार करण्यात आला. तो मला दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ५२** देण्यात येते. दि. २२.०३.२०२५ रोजी पंढरी कुंभरे याने जागा दाखवण्याकरिता आम्हाला चलण्यास सांगितले त्याप्रमाणे मी व पोलिस अधिकारी सरकारी वाहनाने आरोपीच्या सांगण्याप्रमाणे सोनपूर गावाला लागून असलेल्या शेतीत गेलो. पंढरी कुंभरे याने सांगितले की, दि. १३.०३.२०२५ रोजी त्याने त्या जागेवर रानडुक्कर मारले

आहे. त्याप्रमाणे पोलिसांनी मेमोरेंडम पंचनामा केला. आरोपी नंदू भलावी याने कबूली दिली की, रानडुक्करचे मास किशोरच्या बाईकने छेदिराम ठाकूरला दिले. त्याप्रमाणे त्याचा कबूली जबाब नोंदवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. आरोपी छेदिराम ठाकूर यांनी कबूली दिली की, किशोर व पंढरी याने रानडुक्कराचे मास त्याच्या पर्यंत पोहचवले. त्याप्रमाणे त्यांचा कबूली जबाब नोंदवला. त्यावर मी सही केली. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. (सर्व कबूली जबाब एकाच पानावर घेण्यात आल्याने त्यास एकत्रीत **निशाणी क्र. ५३** देण्यात येते.)

**४.** दि. २३.०३.२०२५ रोजी राजू व मानिक शेलू यांनी कबूली जबाब दिला. राजू व मानिक शेलू सोबत होते. त्यांनी सांगितले की, ज्या दिवशी वाघ मेला त्या दिवशी ते त्यांच्या राहत्या घरी तोरणी गावी होते. त्यांनी सांगितले की, वसंता बन याने त्या दोघांची नावे या पूर्वीच्या केसमध्ये घेतली होती. त्याप्रमाणे त्यांचा कबूली जबाब नोंदवण्यात आला. तो मला दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ५४** देण्यात येते. मी आरोपींना पाहिल्यास ओळखू शकतो. ते आज विडीओ कॉन्फरंस द्वारे न्यायालयात हजर आहेत.

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्रीमती. जे. एच. शेंडे यांचेमार्फत**

**५.** मी वन परिक्षेत्र खापा येथे चालक म्हणून काम करतो. मी मानधनवर काम करतो. हे म्हणणे खरे नाही की, दि. १४.०३.२०२५ रोजीचा मौका पंचनामा वन विभागाच्या कार्यालयात बसून लिहण्यात आला. सदरचा पंचनामा दुपारी २.०० ते २.३० च्या दरम्यान सुरू झाला व सायंकाळी ५.०० ते ५.३० वाजताच्या दरम्यान संपला. घटनास्थळाच्या उत्तर- पश्चिमला नाला होता व पूर्व-दक्षिणला शेती होती. पूर्वे दिशेकडील शेती बाजन घाटे, सिरोंजी यांची होती. पश्चिमेकडील शेतीचा शेत क्रमांक मी सांगू शकत नाही. मौका पंचनामा राठोड मॅडमनी नोंदवला. त्याची जि.पी.एस. रिडींग मला सांगता येणार

नाही. पंचनामा करतांना माझ्या सोबत वन अधिकारी शेलार, कुकलारे, गिरी मॅडम, राठोड मॅडम, गडलिंगे साहेब इत्यादी होते.

**६.** दि. १६.०३.२०२५ रोजीचा मौका पंचनामा कशाबद्दल होता हे मला लक्षात नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा पंचनामा वन परिक्षेत्रच्या कार्यालयात लिहण्यात आला. तो किती वाजता सुरू झाला व संपला व मी त्यावर किती वाजता सही केली हे मी सांगू शकत नाही. सदरचा पंचनामा कोणी नोंदवला हे मला आठवत नाही. मी पंचनामा वाचला होता. परंतु अनेक पंचनामे असल्याचे मला सदर पंचनाम्याबाबत सांगता येणार नाही.

**७.** पंढरी कुंभरेच्या अंगझडती पंचनाम्याची तारीख मी सांगू शकत नाही. तसेच किती वाजता झडती घेतली होती हे मी सांगू शकत नाही. झडती कशाबद्दल होती हे मी सांगू शकत नाही.

**८.** किशोर भलावीच्या अंगझडती पंचनाम्याची तारीख मी सांगू शकत नाही. तसेच किती वाजता झडती घेतली होती हे मी सांगू शकत नाही. झडती कशाबद्दल होती हे मी सांगू शकत नाही.

**९.** नंदू भलावीच्या अंगझडती पंचनाम्याची तारीख मी सांगू शकत नाही. तसेच किती वाजता झडती घेतली होती हे मी सांगू शकत नाही. झडती कशाबद्दल होती हे मी सांगू शकत नाही. त्यात त्यांचे कपडे जप्त केले याबाबत लिहिलेले आहे. कोणत्या रंगाचे कपडे होते हे मी सांगू शकत नाही. अंग झडती पंचनामा कोणी तयार केला हे मी सांगू शकत नाही. मला नि.क्र. ४४ वरील जप्ती पंचनाम्याची तारीख सांगता येणार नाही. सदर पंचनाम्यामध्ये नंदू भलावी कडून काही मिळाले नव्हते. फक्त कपडे मिळाले होते.

**१०.** छेदिराम घसीराम ठाकूर यांना कोणत्या तारखेला अटक झाली हे मी सांगू शकत नाही. नि.क्र. ४६ प्रमाणे छेदिराम ठाकूर यांची किती वाजता व कोणत्या तारखेला अंग झडती घेण्यात आली हे मी सांगू शकत नाही. अंग झडती कोणी घेतली हे मी सांगू शकत नाही. नि.क्र. २४ प्रमाणे कबूली जबाब जिथे रानडुक्कर मारले होते त्या शेतात

नोंदवण्यात आला. पंढरी कुंभरे यांचा कबूली जबाब कोणत्या तारखेचा आहे हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा कबूली जबाब कोणत्या वन अधिकारी यांनी नोंदवला हे मी सांगू शकत नाही. कबूली जबाबवर कोणत्या तारखेला व किती वाजता सही केली हे मी सांगू शकत नाही. कबूली जबाब मी वाचला होता परंतु तो मला आता आठवत नाही. कबूली जबाबमध्ये काय लिहिले आहे हे मला पूर्ण आठवत नाही. दि. २२.०३.२०२५ रोजी मी स्पॉटवर गेलो होतो. मौकाच्या चारही दिशांकडे काय काय आहे हे मी सांगू शकत नाही. त्याचे जि.पी.एस. रिडींग मी सांगू शकत नाही. मौका पंचनामा दुपारी २.०० वाजता सुरू होवून सायंकाळी ४.३० वाजताच्या दरम्यान संपला. कोणत्या अधिका-याने मौका पंचनामा केला हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मौका पंचनामा वन विभागाच्या कार्यालयामध्ये बसून लिहिला होता.

**११.** नि.क्र. ४७ वरील जप्ती पंचनामा दि. २२.०३.२०२५ रोजी केला. पंढरी कुंभरे विरुध्द सदरचा पंचनामा किती वाजता तयार केला हे मी सांगू शकत नाही. पंढरीकडून जर्मनचे घमेले, प्लास्टीक कोटेड विद्युत तारेचा बंडल, आकोडा व बांबू जप्त करण्यात आले. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा मुद्देमाल माझ्यासमक्ष जप्त झाला नाही. प्लास्टीक कोटेड वायर किती फुट होती हे मी सांगू शकत नाही. बांबू ५ ते ५.३० मिटर लांब होता. या साहित्या व्यतिरिक्त खाली हाताडण्याकरिता गोनी जप्त केली. जप्ती पंचनामा कोणी तयार केला हे मी सांगू शकत नाही. जप्ती पंचनामा किती वाजता सुरू होवून संपला हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, जप्ती पंचनामा वनक्षेत्र कार्यालयात बसून लिहिला.

**१२.** नि.क्र. ४८ वरील राजू दरसमाचा अंग झडती पंचनामा दि. १९.०३.२०२५ रोजी केला. तो सकाळी ८.३० ते ९.०० च्या दरम्यान सुरू झाला व सकाळी १०.३० ते ११.०० वाजताच्या दरम्यान संपला. तो कोणत्या वन अधिकाराने लिहिला हे मी सांगू शकत नाही.

**१३.** मानिक सिलू याची अंग झडती दि. १९.०३.२०२५ रोजी घेण्यात आली. त्याची अंगझडती कोणत्या अधिका-याने घेतली हे मी सांगू शकत नाही. त्याची अंग झडती तोरणी येथे झाली. सदरचा पंचनामा कोणी लिहिला हे मी सांगू शकत नाही.

**१४.** नि.क्र. २५ वरील किशोर भलावी, छेदिराम ठाकूर व नंदू भलावी यांचा कबूली जबाब कधी नोंदवण्यात आला हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यांचा कबूली जबाब कोण नोंदवला हे मी सांगू शकत नाही. कबूली जबाब किती वाजता सुरू केला व संपवला हे मी सांगू शकत नाही. मी मौक्यावर गाडी क्र. एम.एच.३१ डी.झेड ०६७९ याने गेलो. मी दि. २३.०३.२०२५ रोजी गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, मेमोरेंडम व कबूली जबाब कोणी लिहिला हे मी सांगू शकत नाही. सदरचा पंचनामा किती वाजता सुरू केला व संपला हे मी सांगू शकत नाही.

**१५.** नि.क्र. ५० वरील पंचनाम्यांमध्ये दि. २१.०३.२०२५ रोजी टेकाडी येथे कोणाकडे गेलो होतो हे मला सांगता येणार नाही. मोबाईलचे लोकेशन मिळाले होते म्हणून चौकशीसाठी गेलो होतो. मोबाईल कोणाचे आहे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा पंचनाम्यावर मी वन कार्यालयामध्ये बसून सही केली. हे म्हणणे खरे आहे की, तो किती वाजता केला व कोणी केला हे मी सांगू शकत नाही.

**१६.** नि.क्र. ५१ वरील किशोर भलावी चौर खैरी येथे राहतात. यांच्याकडून मोटर सायकल जप्त झाली. मोटर सायकलचा क्रमांक मी सांगू शकत नाही. जप्तीची तारीख दि. २२.०३.२०२५ होती. जप्ती पंचनामा दुपारी १.०० ते १.३० वाजताच्या दरम्यान सुरू झाला व दुपारी ३.०० वाजता संपला. जप्ती पंचनामा कोणत्या वन अधिकारीनी तयार केला आहे हे मी सांगू शकत नाही.

**१७.** नि.क्र. ५२ वरील सुरी कोणत्या अधिका-याने जप्त केली हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, जप्ती सुरी मी वनक्षेत्राच्या कार्यालयात पाहिली. हे म्हणणे खरे

आहे की, त्या सुरीची लांबी-रुंदी मी सांगू शकत नाही. पंचनामा किती वाजता सुरू करून संपला हे मी सांगू शकत नाही.

**१८.** नि.क्र. ५३ वरील कबूली जबाब दि. २२.०३.२०२५ रोजीचा आहे. नंदू भलावीचा जबाब किती वाजता सुरू झाला व संपला हे मी सांगू शकत नाही. मी त्यावर सायंकाळी ५.०० वाजताच्या दरम्यान सही केली. किशोर भलावी व छेदिराम ठाकूर यांच्या जबाबावर एकाच दिवशी एकाच वेळी सही केली. कबूली जबाब कोणत्या वन अधिका-याने लिहिले हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी कबूली जबाब वाचले नाही. कबूली जबाब कोणी लिहिले हे मला आठवत नाही. कबूली जबाब सोनपूर गावाजवळील शेतामध्ये दिला होता. मी सोनपूर गावाला किती वाजता पोहोचलो हे सांगता येणार नाही. सोनपूर गावाचे जि.पी.एस. रिडींग मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे पंचनामे वन विभागाच्या कार्यालयात बसून त्यावर सहया केल्या. हे म्हणणे खरे नाही की, तिन्ही आरोपींनी काय कबूली दिली हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, कोणत्या अधिका-याने कबूली जबाब व मेमोरेंडम लिहिला आहे हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, कोणत्या अधिका-याची कबूली जबाबवर सही आहे हे मी सांगू शकत नाही.

**१९.** नि.क्र. ५४ वरील मानिक सिलू व राजू दरसमा यांचा कबूली जबाब दि. २३.०३.२०२५ रोजीचा आहे. तो दुपारी १२.०० वाजेच्या दरम्यान दिला होता. तो कोणत्या वन अधिकारी यांनी लिहिला हे मी सांगू शकत नाही. त्यावर राजू व मानिक यांनी सही केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा कबूली जबाब वन विभागाच्या कार्यालयामध्ये बसून लिहिला व त्यावर मी सही केली. हे म्हणणे खरे आहे की, कोणत्या अधिका-याने कबूली जबाब लिहिला हे मी सांगू शकत नाही. तोरणी गावाला गाडी क्र. एम. एच. ३१ डी. झेड ०६७९ या गाडीने गेलो. तोरणी गावामध्ये किती वाजता सही केली हे मला आठवत नाही. कबूली जबाब व मेमोरेंडम पंचनामा कोणत्या अधिका-याने लिहिला हे मी सांगू शकत नाही. त्यावर कोणत्या अधिका-याची सही आहे हे मी सांगू शकत नाही. हे

म्हणणे खरे आहे की, वन अधिकारी यांनी पंचनाम्यात जे लिहिले आहे ते जसेच्या तसे मी सांगू शकत नाही. मी केसचा गुन्हा क्रमांक सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी सोबत असल्याने मी पंचनाम्यावर सहया केल्या. हे म्हणणे खरे नाही की, सर्व पंचनामे वन विभागाच्या कार्यालयात तयार केले व त्यावर मी सही केली. मी माझे आधार कार्ड चार्जशीट सोबत जोडले नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समोर कोणत्याही प्रकारची जप्ती झाली नाही व सहया करण्याकरिता मी सहया केल्या. हे म्हणणे खरे नाही की, मी ड्रायव्हर या नात्याने सहया केल्या. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष दिली आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत
समक्ष

SONPARI MAHENDRA GADE
Digitally signed by SONPARI MAHENDRA GADE
Date: 2026.01.19 12:56:12 +0530

सावनेर,
दिनांक १४.०१.२०२६

(एस. एम. गाडे)
**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
(न्यायालय क्र.०३) सावनेर

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF evidence are same word to word, as per the original evidence.

Name of Stenographer :- D. R. Aglawe